# -:प्रेस नोट:-

## श्री. सरजीव अजाबराव बोरकर, वय 36 वर्षे, कृषी सहाय्यक (वर्ग 3), तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती जि. चंद्रपूर येथील कृषी सहायक यांचे विरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर पथकाची कारवाई

तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती, जि. चंद्रपूर येथील आलोसे श्री. सरजीव अजाबराव बोरकर, वय ३६ वर्षे, कृषी सहाय्यक (वर्ग ३) यांनी तक्रारदार यांना १०००/— रूपये मागणी करून स्विकारल्याने आलोसे यांचे विरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे मौजा माजरी कॉलरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथील रहीवासी असुन शेतकरी आहेत. त्यांची मौजा नंदोरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे शेती असुन त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती येथे महाडिबीटी योजनेअंतर्गत शेतमाल फवारणीकरीता बॅटरी स्प्रे पंप मिळणेकरीता सप्टेंबर/२०२४ मध्ये अर्ज केला होता. त्यानुसार तक्रारदार यांना फवारणी स्प्रे पंप सप्टेंबर/२०२४ मध्येच मंजुर करण्यात आलेला होता. त्यानुसार दिनांक ०७/१०/२०२४ रोजी मौजा चंदनखेडा, ता. भद्रावती जि. चंद्रपूर येथे कृषी विभागामार्फत स्प्रेपंप वाटप झाले होते, परंतु तक्रारदार हे बाहेरगावी असल्याने स्प्रे पंप घेवू शकले नाही. त्यानंतर त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती येथे जावून आलोसे श्री. सरजीव अजाबराव बोरकर, कृषी सहायक यांची भेट घेतली असता कृषी स्प्रे पंप देणेकरीता टाळाटाळ करीत होते. त्यानंतर दिनांक ०३/०२/२०२५ रोजी आलोसे श्री. सरजीव बोरकर यांनी तक्रारदार यांना फोन करून शेतीसाठी उपयोगी असलेले फवारणी पंप देणेकरीता १०००/— रूपयांची मागणी केली होती.

परंतु तक्रारदार यांना आलोसे श्री. बोरकर यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे दिनांक ०३/०२/२०२५ रोजी तक्रार दिली. प्राप्त तक्रारीवरून आज दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी/सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यामध्ये पडताळणी कार्यवाहीदरम्यान आलोसे श्री. सरजीव बोरकर यांनी तक्रारदार यांचे कृषी विभागांतर्गत मंजुर फवारणी पंप देण्याचे कामाकरीता १०००/— रूपये लाच रक्कम मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

त्यावरून आज दि. ०४/०२/२०२५ रोजी नंदनवन प्रवेशद्वार, विनायक लेआऊट, वरोरा, जि. चंद्रपूर येथे पंचासमक्ष सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. सरजीव बोरकर यांनी १०००/— रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर व श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले, पोशि वैभव गाडगे, पोशि अमोल सिडाम, प्रदिप ताडाम, राकेश जांभुळकर, म.पो.शि.पुष्पा काचोळे व चापोशि सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांनी यशस्वी पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

**<u>भ्रष्टाचाराविरूध्द तक्रारीसाठी आमच्याशी संपर्क साधा</u>**

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक :— ०७१२—२५६१५२०
  श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक :— ०७१७२—२५०२५१
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ९३२२२५३३७२
  श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ८८८८८५७१८४

• टोल फ्रि क्रमांक :— १०६४ • ऑनलाईन तक्रारीसाठी वेबसाईट:— www.acbmaharashtra.gov.in @acbmaharashtra.net

(जितेन्द्र गुरनुले)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्यूरो चंद्रपूर